




दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक





● वर्ष : ०२ ● अंक : ०२० ● पुणे ● बुधवार, दि. २७ नोव्हेंबर २०२४ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313


# अलंकापुरी झाली भक्तिरसात चिंब; इंद्रायणी काठी दिंड्यांचा मेळा

**आळंदी (दै. आरंभ पर्व)**

इंद्रायणी पवित्र तिर्थस्नान, नगरप्रदक्षिणा आणि इंद्रायणी काठी जमलेला वैष्णवांच्या दिंड्यांचा मेळा... अशा उत्साही वातावरणात मंगळवारी (ता. 26) कार्तिकी एकादशीनिमित्त नगरप्रदक्षिणा करत भक्तिरसात सुमारे पाच लाख वैष्णवांनी वारीचा आनंद घेतला. देऊळवाड्यातून दुपारी माउलींचा चांदीचा मुखवटा पालखीत ठेवून नगर प्रदक्षिणा करण्यात आली. बुधवारी (ता. 27) द्वादशीनिमित्त माउलींचा रथ गोपाळपूरातून नगरप्रदक्षिणेसाठी निघणार आहे.




कार्तिक वद्य अष्टमीपासून माउलींच्या संजीवन समाधी सोहळ्याच्या कार्यक्रमास सुरुवात झाली. निवडणुकीची धामधूम आणि वारी एकाच वेळी आल्याने पहिले तीन-चार दिवस वारकऱ्यांची संख्या अल्प प्रमाणात जाणवत होती. अगदी दशमीलाही दिवसभर गर्दी कमी होती. मात्र, मध्यरात्रीपासून गर्दी वाढत केली वैष्णवांचा उत्साह अमाप दिसत होता.

शहरातील प्रदक्षिणा रस्त्याबरोबरच पालिका चौक, चाकण रस्ता, गोपाळपुरा, वडगाव रस्ता आदी ठिकाणी वारकऱ्यांची संख्या वाढू लागली होती. महाद्वार तसेच इंद्रायणी तीरावर अलोट गर्दी होती. ठिकठिकाणी 'माउली माउली'चा गजर आणि टाळ-मृदंगाचा नाद ऐकू येत होता.

माउलींच्या समाधी दर्शनासाठीची दर्शनबारीची रांग पूर्ण भरून नदीपलीकडे गेली. दर्शनबारीतून सात तासांपेक्षा अधिक वेळ लागत होता. आळंदीत येणारे सर्व रस्ते चारचाकी वाहनांसाठी बंद ठेवले होते.

कार्तिकी एकादशीनिमित्त घाटावर पहाटेपासून वारकऱ्यांनी स्नानासाठी गर्दी केली होती. दुपारी एक वाजल्यानंतर माउलींची पालखी नगरप्रदक्षिणेसाठी देऊळवाड्यातून बाहेर निघाली.

## लोखंडे दाम्पत्याला दर्शनाचा पहिला मान

आळंदी - कार्तिकी एकादशी पहाटपुजेवेळी माऊलींच्या संजीवन समाधी दर्शनाचा पहिला मान शिंपी टाकळी गावातील अशोक लोखंडे आणि अलका लोखंडे (ता. निफाड, जि. नाशिक) या दांपत्याला मिळाला. लोखंडे दांपत्याची ही नाशिक ते आळंदी पायी वारी करण्याची दुसरी वेळ आहे. तब्बल ११ दिवसांचा पायी प्रवास करत लोखंडे दांपत्य गावाकडच्या दिंडीसोबत आळंदीत दाखल झाले. इंद्रायणी स्नान केल्यानंतर सोमवारी (ता. २५) सायंकाळी सहाच्या दरम्यान ते दर्शनाच्या रांगेत उभे राहिले. मध्यरात्री एक वाजता त्यांना पहाटपुजेसाठी देऊळवाड्यात प्रवेश मिळाला. दर्शनाचा पहिला मान मिळाल्याने मोठा आनंद झाल्याचे शेतकरी असलेल्या लोखंडे दांपत्याने सांगितले. दरम्यान, देवस्थानने या दांपत्याला माऊलींची प्रतिमा, शाल आणि ज्ञानेश्वरी भेट दिली.

# नागराज मंजुळे यांना समन्स

- चित्रपटाची कथा सापडली वादाच्या भोवऱ्यात
- मूळ कथालेखक संजय दुधाने यांची पुणे न्यायालयात धाव






**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी घोषित केलेल्या खाशाबा जाधव यांच्या चित्रपटातील कथा वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. चित्रपटाची मूळ कथा लेखक संजय दुधाणे यांची असून, त्यांनी कॉपीराईटबाबत दिग्दर्शक नागराज मंजुळे यांच्यासह जिओ स्टुडियो, आटपाट प्रोडक्शन, निर्माती ज्योती देशपांडे यांच्याविरोधात पुणे जिल्हा व सत्र न्यायालयात दावा दाखल केला आहे. याबाबत न्यायालयाने नागराज मंजुळे यांच्यासह इतर प्रतिवाद्यांना समन्स पाठवले आहे.

खाशाबा जाधव यांच्या चरित्र पुस्तकाचे हक्क 2001 पासून संजय दुधाणे यांच्याकडे आहेत. भारत सरकारच्या कॉपीराईट कार्यालयाचे प्रमाणपत्रही दुधाणे यांच्याकडे आहे. चित्रपटाची निर्मिती व त्याचे प्रदर्शन करण्यास निरंतर मनाई व ठरावासाठी दुधाणे यांनी ॲड. रविंद्र शिंदे व ॲड. सुवर्णा शिंदे यांच्यामार्फत पुणे जिल्हा व सत्र न्यायालयात दावा दाखल केला आहे. याबाबत स्वतः हजर होण्याचे समन्स न्यायालयाने मंजुळे व देशपांडे यांना पाठवले आहे.

गेल्या चार वर्षांत स्वतः नागराज मंजुळे यांच्यासोबत दोन, तर त्यांच्या वकिलांसोबत दोन समझोता बैठका झाल्या. मात्र, चारही बैठकांत निर्णय न झाल्याने अखेर संजय दुधाणे यांनी कॉपीराईट कायद्याचा भंग केल्याप्रकरणी कोर्टात धाव घेतली आहे. चित्रपटाची मूळ कथा दुधाने यांची असताना मंजुळे यांनी खाशाबा जाधव यांचे पुत्र रणजीत जाधव यांच्याशी बेकायदेशीर करार केल्याने हा वाद निर्माण झाला आहे.

कोरोनापूर्वी 2019 मध्ये मंजुळे यांनी रणजीत जाधव यांच्याशी करार केला होता. मूळात रणजीत जाधव यांनीच 30 ऑगस्ट 2013 रोजी कराड येथे पत्रकार परिषद घेऊन खाशाबांच्या चित्रपटाची कथा ही संजय दुधाणे यांची असल्याचे घोषित केले होते. मात्र, आता रणजीत जाधव यांनी दुधाणे यांना डावलून संमती करार केल्याने हा वाद निर्माण झाला आहे. ही बाब लक्षात येताच दुधाणे यांनी मंजुळे यांची 2020 मध्ये रणजीत जाधव यांच्यासोबत पुण्यात भेट घेतली होती. त्यावेळी वाईमधील पटकथालेखक तेजपाल वाघही उपस्थित होते. चर्चेत लेखक म्हणून तुमचे नाव दिले जाईल व रणजीत जाधव यांच्याप्रमाणेच समान वाटा देऊन तुमचा मान राखला जाईल, असा शब्द नागराज मंजुळे यांनी दिला होता. रणजीत जाधव यांनीही या प्रस्तावाला होकार दिला होता, असे दुधाने यांनी दाखल केलेल्या दाव्यात म्हटले आहे. पुण्यातील बैठकीनंतर सकारात्मक प्रतिसाद न आल्याने 26 डिसेंबर 2022 रोजी दुधाणे यांनी मंजुळे यांना नोटिस पाठवली. कथालेखकाच्या वादामुळे आपण चित्रपट करणार नाही, असे मंजुळे यांनी रणजीत जाधव यांना कळवले होते. त्यानंतर 5 जानेवारी 2023 रोजी रणजीत जाधव यांनी त्यांच्या व नागराज मंजुळे यांच्या वकिलांसोबत दुधाणे यांची पुण्यात भेट घेऊन सहकार्य करण्याची विनंती केली.









# महाराष्ट्र विधानसभा निवडणूक विश्लेषण 'जोरका धक्का...'

संपूर्ण देशाचे लक्ष लागून असणाऱ्या महाराष्ट्रातील निवडणुकांच्या निकालातून कल स्पष्ट झाला असून लोकसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर नव्या दमाने आणि जोमाने पुढे आलेला भारतीय जनता पक्ष आणि महायुतीने मारलेली मुसंडी हे लक्षवेधी मुद्दे आगामी काळातील राजकारणाचे वारे निर्देशित आणि नियमित करणारे ठरणार आहेत. राज्यातील या निवडणुकीला राजकीय अस्थैर्य, विरोधकांचा तीव्र आणि टोकाचा विरोध, दिवसामाजी बिघडत जाणारे सामाजिक वातावरण याची किनार होतीच, खेरीज बदलापूरचे बालिका अत्याचार प्रकरण, शिवाजीराजांचा पुतळा कोसळणे, मराठा आंदोलनाने वातावरण गढूळ होणे आदी कारणेदेखील होती. खोके सरकार, गद्दार, आमदार अपात्रतेच्या मुद्द्यांचा कोलाहलही पाठीमागे होताच. तशातच लोकसभा निवडणुकीमध्ये देशात जेमतेम तारल्या गेलेल्या भाजपाला राज्यातील जनतेने नाकारल्याचे चित्रही तणाव वाढवणारे होते. मात्र अशा तणावग्रस्त अवस्थेतही महायुतीने संयमाने आणि नेटक्या नियोजनानिशी परिस्थिती सावरली आणि नेत्यांपासून सर्वसामान्य कार्यकर्त्यांपर्यंत सगळ्यांनीच प्रयत्नपूर्वक जनमताचा कौल आपल्याकडे वळवण्यात यश संपादीत केले.

थोडक्यात, हा जनतेने घेतलेला एक निर्णय असला तरी त्याचे अनेक अन्वयार्थ निघतात. या काळात संपूर्ण देशाने योगी आदित्यनाथ यांच्या 'बटेंगे तो कटेंगे' तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या 'एक हैं तो सेफ है'चा नारा ऐकला. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये तो लक्षवेधी ठरलेला दिसत आहे. त्यामुळेच महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालाचे कल भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीए आघाडीचे वादळ दर्शवित असणे स्वाभाविक आहे. महाराष्ट्रातील 288 जागांमध्ये भाजपाच्या महायुती आघाडीला 200 हून अधिक जागा मिळणे जनतेचा बदलता कल स्पष्ट करणारे आहे. दुसरीकडे, उत्तर प्रदेशमध्ये नऊ विधानसभा जागांसाठी झालेल्या पोटनिवडणुकीत भाजपाला किमान सात जागा मिळताना दिसत आहेत. या विजयाचे प्रमुख कारण ध्रुवीकरण असल्याचे मानले जात आहे. अर्थातच याचे विश्लेषण होत राहणार आहे.

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या विजयानंतर भाजपा सावध झाला. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडीला 48 पैकी 31 तर महायुतीला 17 जागा मिळाल्या. यानंतर भाजपा आणि संघाने आपली रणनीती बदलली. अत्यंत सावधगिरीने योगी आणि मोदींनी बाजी मारली. 2019 मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीचे आकडे बघितले, तर भाजपाला 105 जागा मिळाल्या होत्या. दुसरीकडे, शिवसेनेला (अविभाजित शिवसेना) 56 जागा, राष्ट्रवादीला (अविभाजित राष्ट्रवादी) 54 जागा आणि काँग्रेसला 44 जागा मिळाल्या होत्या. त्यानंतर शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेसने मिळून सरकार स्थापन केले. मात्र, ही आघाडी जास्त काळ सरकार चालवू शकली नाही. जून 2022 मध्ये शिवसेनेतील अंतर्गत वादामुळे एकनाथ शिंदे वेगळे झाले. अजित पवारांनी राष्ट्रवादीतील एक गट सोबत आणला. यानंतर ते एकनाथ शिंदे यांच्या भाजपा आणि शिवसेना सरकारमध्ये सामील झाले आणि उपमुख्यमंत्री झाले. राष्ट्रवादीच्या मतदारांना महायुतीकडे वळवण्यात या घटकांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्याच वेळी शिवसेनेच्या मतदारांना महायुतीशी जोडण्यातही शिंदे यांना यश आले. ताज्या निकालाने महाराष्ट्रातील मराठा फॅक्टर आणि बेरोजगारीचा मुद्दा महाविकास आघाडीच्या फायद्याचा राहिला नसल्याचे स्पष्ट केले आहे. किंबहुना, मतांच्या ध्रुवीकरणामुळे हे मुद्दे मागे पडले, असेही आपण म्हणू शकतो. त्याच वेळी देशभरात बळकट झालेल्या हिंदुत्वासारखा मुद्दा महायुतीने समोर आणला. महायुतीला अपेक्षेप्रमाणे योगी आणि मोदींच्या घोषणांची मोठी मदत मिळाली. हरियाणामध्ये योगी आदित्यनाथ यांनी ही घोषणाबाजी केली आणि तिथे भाजपाचा विजय झाला. मात्र, भाजपाने योगींचे 'बटेंगे ते कटेंगे'असे बॅनर महाराष्ट्रात लावले तेव्हा तीव्र प्रतिक्रिया उमटल्या, कारण उत्तर प्रदेश किंवा हरियाणाप्रमाणे महाराष्ट्रामध्ये हिंदुत्व प्रचलित नाही. पण, निकाल समोर आल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणातही ध्रुवीकरणाचे पर्व सुरू झाल्याचे जाणवले आहे. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने 'संविधान बचाओ'चा नारा दिला होता. ही घोषणा विशेषत: उत्तर प्रदेशमधील लोकसभा मतदारसंघांमध्ये कामी आली. मात्र महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत या घोषणेचा शून्य परिणाम बघायला मिळाला. खेरीज मराठा आरक्षणावरही काँग्रेस बाजी मारू न शकल्याचे चित्र दिसत आहे. सर्वात महत्त्वाचा आणि लक्षात घेण्याजोगा मुद्दा म्हणजे महाराष्ट्र निवडणुकीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची मोलाची मदत झाली आहे. हरियाणाप्रमाणे येथेही आरएसएसचे लोक भाजपाच्या प्रचारासाठी सक्रिय होते. किंबहुना, लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशमध्ये भाजपाच्या खराब कामगिरीचे कारण जनसंपर्क कमी पडणे, सर्वसामान्यांपर्यंत कार्यकर्ते न पोहोचणे हे मानले जात होते. मात्र ही चूक सुधारत महाराष्ट्रात संघ कार्यकर्ते प्रचारात उतरले. संघाच्या स्वयंसेवकांनी भाजपाच्या मागे आपली शंभर टक्के ताकद लावली होती. भाजपालाच मत द्या, असा त्यांचा थेट प्रचार नसला तरी अप्रत्यक्षपणे त्यांनी आपल्याच विचाराच्या भाजपाला मोठे बळ देण्यासाठी प्रयत्न केले.

त्यामुळेच यंदा गल्लोगल्ली, प्रत्येक वॉर्डमध्ये संघाची ताकद दिसली. त्यामुळेच भाजपाचे पारडे यशाकडे मोठ्या प्रमाणात झुकले. लोकसभा निवडणुकीमध्ये मुस्लीमांची एकगठ्ठा मते उद्धव ठाकरेंच्या पारड्यात पडली. मात्र आताच्या निवडणुकीत त्याच्या परिणामांची जाण करून देण्यात महायुती यशस्वी ठरली. लोकसभा निवडणुकीनंतर बांगलादेशमध्ये घडलेल्या घटना जनतेने उघड्या डोळ्यांनी पाहिल्या. जणू त्याला प्रतिक्रिया म्हणूनच सिमल्यातील एक अवैध मशिद पाडण्यासाठी तिथला समस्त हिंदू समाज एकवटलेला दिसला. म्हणजेच जातीपातीच्या, प्रांत, भाषेच्या नावाने आपण वेगवेगळे राहिलो तर आपल्यावर अतिक्रमण होईल, हे मत जनतेला पटलेले दिसले. एक राहिलो तर आपल्याकडे कोणी वाकड्या नजरेने पाहू शकणार नाही, कोणी हल्ला करणार नाही हा विचार स्वीकारल्याचेही जनतेने ताज्या निकालाद्वारे सूचित केले आहे. एकीचा हाच मुद्दा महाराष्ट्रात, विशेषत: ग्रामीण भागात वारकरी सांप्रदायानेही उचलून धरला. त्यांनी छोट्या छोट्या गटसभा घेऊन, अगदी 50-100 लोकांच्या सभा घेत हा विचार पोहोचवण्याचे मोलाचे काम केले. एखाद्या देवळात, आवारात पार पडलेल्या अशा छोट्या सभांची संख्या 60 ते 70 हजारांच्या घरात होती. त्याचाही परिणाम ताज्या निकालावर प्रभावीपणे दिसून येत आहे. या सगळ्याबरोबरच जनतेच्या डोळ्यांसमोर महायुतीचे काम होतेच. मध्य प्रदेशातील भाजपा सरकारच्या 'लाडली बहन योजने'नंतर महाराष्ट्रातील महायुती सरकारनेही 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' सुरु केली आणि वेगाने रेटली.






# संचेती हॉस्पिटल्स तर्फे डोझीच्या सहकार्याने पुण्यातील पहिला स्मार्ट वॉर्ड उपक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अस्थिरोग चिकित्सेमध्ये उत्कृष्टतेचा वारसा असलेल्या संचेती ग्रुप ऑफ हॉस्पिटल्सने सर्वात अत्याधुनिक सुविधा असलेल्या संचेती ॲडव्हान्स्ड आर्थो केअर हॉस्पिटलची घोषणा केली आहे. 300 खाटांची अद्ययावत वैद्यकीय सुविधा पूर्णपणे कार्यान्वित असून स्मार्ट,ग्रीन,हायटेक (एसजीएच) पायाभूत सुविधांच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. संचेती हॉस्पिटलने नेहमीच अभिनव तंत्रज्ञान केंद्रस्थानी ठेवले असून आता डोझी ने विकसित केलेले एआय आधारित रिमोट मॉनिटरींग सिस्टिम (आरएमएस) आणि अर्ली वॉर्निंग सिस्टिम (ईडब्ल्यूएस) च्या साहाय्याने सुधारित रुग्ण सुरक्षेसाठी पुण्यातील पहिला स्मार्ट वॉर्ड उपक्रम सुरु केला आहे. संचेती ग्रुप ऑफ हॉस्पिटल्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.पराग के.संचेती म्हणाले की,आरोग्यसेवा क्षेत्रात अग्रणी संस्था म्हणून आमची वचनबध्दता चिकित्सा पलीकडे जाऊन रुग्णसेवा नव्याने परिभाषित करणाऱ्या आधुनिकतेकडे जाण्याचा आमचा प्रयत्न असतो. डोझीची अद्ययावत मॉनिटरिंग सिस्टिम प्रस्थापित करणे हे हॉस्पिटलच्या आरोग्यसेवेमध्ये एक परिवर्तनीय पाऊल आहे.रुग्णांसाठी अधिक चांगले परिणाम मिळविण्यासाठी डाटाचलित तंत्रज्ञान,प्रतिक्रियात्मक वैद्यकीय सेवांपासून प्रतिबंधात्मक व सक्रीय आरोग्य सेवा प्रारूपाच्या दिशेने संचेती हॉस्पिटलची कटिबध्दता दर्शविते.या स्मार्ट वॉर्ड उपक्रमाअंतर्गत बिगर-आयसीयू बेडस या अत्याधुनिक रिमोट पेशंटस मॉनिटरींग सिस्टिम्सयुक्त होतील,ज्यामुळे महत्त्वाच्या वैद्यकीय निकषांवर देखरेख ठेऊन गरज पडल्यास योग्य वैद्यकीय सेवा देता येतील. या अत्याधुनिक उपायांचा अवलंब सर्व्हिंग पेशंटस् इज सर्व्हिंग गॉड या तत्त्वाशी सुसंगत असून संचेतीचे संस्थापक अध्यक्ष डॉ.के.एच.संचेती यांची वचनबध्दता आहे.



डोझीच्या साहाय्याने आरोग्य सेवा कर्मचाऱ्यांना हृदयाचे ठोके,रक्तदाब,एसपीओ2 पातळी,तापमान आणि ईसीजी यांसारख्या महत्त्वाच्या वैद्यकीय बाबींवर दुरुस्तपणे देखरेख ठेवता येईल.डोझीच्या अर्ली वॉर्निंग सिस्टिम (ईडब्ल्यूएस) च्या सहाय्याने या महत्त्वाच्या बाबींचे कल लक्षात घेऊन मागोवा ठेवतो येतो आणि रुग्णाच्या वैद्यकीय परिस्थितीत बिघाड झाल्यास आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांना सूचना मिळून योग्य वेळेत गरजेनुसार हस्तक्षेप करता येतो.डोझी तर्फे एआय आधारित बॅलिस्टोकार्डिओग्राफी (बीसीजी) चा वापर केला जातो,ज्यामुळे कॉन्टॅक्टलेस मॉनिटरींग शक्य होते. डोझीच्या तंत्रज्ञानाला पेटंट प्राप्त झाले असून हे तंत्रज्ञान भारतात विकसित केले गेले आहे.या अभिनव तंत्रज्ञानाचा रुग्ण सुरक्षिततेवर,वैद्यकीय परिणामांवर आणि कामकाजाच्या कार्यक्षमतेवर लक्षणीय सकारात्मक प्रभाव पडतो.

संचेती समुहाचा रुग्णकेंद्रित दृष्टीकोन आणि स्मार्ट आणि शाश्वत आरोग्य सेवेसाठी कटिबध्दता ही अद्ययावत रुग्णसुरक्षा साधने उपलब्ध करून देण्याच्या डोझीच्या ध्येयाशी सुसंगत आहे. या धोरणात्मक एकीकरणामुळे सतत देखरेख आणि योग्य वेळेत उपचार हे एक मानक प्रस्थापित होईल,ज्यामुळे परिणामांमध्ये लक्षणीय सुधारणा होतील,असे मत डोझीचे भारतातील प्रमुख कौशल पांड्या यांनी सांगितले.

संचेती ग्रुप हे नैतिक पध्दती आणि विश्वासार्हता यासाठी ओळखले जाते आणि यामुळेच जागतिक दर्जाच्या आर्थोपेडिक सेवांमध्ये अग्रस्थानी आहे. डोझीच्या अद्ययावत तंत्रज्ञानामुळे या वचनबध्दतेला आणखी बळ मिळणार असून संचेतीचे स्थान रुग्ण व आरोग्य सेवा प्रदात्यांसाठी शाश्वत व अभिनव पध्दतींचे ठिकाण म्हणून अधिक दृढ झाले आहे.






# मतदारांनाही "टशन" हवय!

**(दै. आरंभ पर्व) पुणे लक्ष्मण साबळे**

निवडणूक म्हणजे की एक उत्सवच.. पक्ष,नेते ,कार्यकर्ते, मीडिया,आणि मतदार व निवडणुकां संबंधी इतर घटकांची लगबग सुरु असते.

पूर्वीच्या निवडणुका आताच्या निवडणुका यामध्ये जमीन आसमानचा फरक पडत आहे. पूर्वी स्वयंस्फूर्तीने कार्यकर्ते प्रचारामध्ये सहभागी व्हायचे.

आपला उमेदवार जिंकण्यासाठी जीवाचं रान करत होते. आता कार्यकर्तेना चार्ज करण्यासाठी "दाम" खर्चावा लागतोय.. राजकारणावर अभिप्रेत आर्थिक गणिते अवलंबून असल्यामुळे सर्वच यंत्रणा "अर्थ"शिवाय मार्गस्थ होत नाहीत.

विधानसभा निवडणुका असो ग्रामपंचायत निवडणुका प्रचाराचा आवेश नसला तर उमेदवार किंवा पॅनेलचा पराभव ठरलेला असतो. प्रचारामध्ये पूर्वी विकासाचे मुद्दे मुख्य असायचे आता वैयक्तिक टीका टिप्पणीवर जोर देऊन प्रचारात रंग भरला जात आहे.

एकाने दुसऱ्यावर दुसऱ्यांने त्याच्यावर टीका करत तुटून पडले की आपोआप वातावरण गरम होते.

नेता आक्रमक झाल्याने कार्यकर्ते जोरात कामाला सुरुवात करतात.आणि जो जास्त कष्ट घेतो तो विजयी होतो.

आजकाल मतदारांनाही नेत्यांमध्ये कार्यकर्त्यांमध्ये " टशन" हवय असं दिसतं. सध्याच्या राजकारणामध्ये एकेकाळी एकमेकाविरोधात दंड थोपटणारे



नेते मंडळी, एकमेकांना नेस्तनाबूत करण्यासाठी प्रयत्न करतात.

आणि परत एकाकीच पक्षाच्या निर्णयामुळे, किंवा राजकीय कारकीर्द वाचवण्यासाठी एकत्र काम करण्याचा प्रयत्न करतात.

पक्षाचे राजकारण वाढली पाहिजे म्हणून वेगवेगळ्या आघाड्याचा प्रयोग केला जातो. गावापासून राज्यापर्यंत अशा नव्या प्रकारचे राजकारणामुळे पक्षाची किंवा नेत्यांची इच्छा अपेक्षा वाढते.

परंतु ग्राउंड वर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे हेवेदावे कायमच असतात. नेते एकत्र आणि कार्यकर्ते अलिप्त अशी विचित्र परिस्थिती ही अनुभवास मिळते. आयुष्यभर विरोध फक्त परंतु पक्षाचे राजकारण टिकवण्यासाठी विचित्र आघाड्या करणे नेत्यांना जमत असलं तरीही

असे निर्णय व्हायला नकोत त्यापेक्षा शांत बसलेले बरे असा मतप्रवाह अनेक कार्यकर्त्यांमध्ये वाढतोय. त्यामुळे नाराजीच्या भरात निवडणूक पार पडतात. आणि मतदार सगळ्यांचीच "गेम"वाजवतात.. त्यांनाही फक्त टशन हवय. झूंज बघायला कार्यकर्त्यांपेक्षा मतदारांनाही आवडतं हेच ह्यातून दिसून येत. आधुनिक राजकारणामध्ये आक्रमकतेला महत्व प्राप्त झाल्यामुळे प्रेमळ राजकारण करणारे नेत्यांना ही भाषा शैली बदलावी लागणार आहे. कारण कार्यकर्ते सोबत मतदारांनाही डॅशिंगबाज वकृत्व, कर्तुत्व आणि दमदार नेतृत्व हव आहे..

यावरच राजकारणाचे पुढचे चित्र अवलंबून असेल. पक्ष आघाड्या एकत्र करण्याच्या नादामध्ये नेत्यांचे पराभव होत आहेत हे सत्य आहे. परंतु वाद विवाद टाळण्यासाठी गावोगावीचे राजकारण स्थिर शांत करण्यासाठी प्रयत्न अंगलट येतोय.

अशा राजकारणात पडण्यापेक्षा विकासाचे व्हिजन घेऊन राजकारण करणं हीच काळाची गरज दिसून येते.







# सुरेखा मोरे यांना युवा महाराष्ट्र आदर्श शिक्षक भूषण पुरस्कार

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

युवा प्रबोधन साहित्य मंच, मावळ यांच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा राज्यस्तरीय युवा महाराष्ट्र भूषण पुरस्कार वितरण सोहळा 2024 पार पडला. राज्यस्तरीय गुणवंत गुरू गौरव शिक्षकरत्न पुरस्कार प्राप्त सौ.सुरेखा संजीव मोरे यांना युवा महाराष्ट्र आदर्श शिक्षक भूषण पुरस्कार 2024 हा पुरस्कार देण्यात आला. या वेळी प्रमुख पाहुणे संस्थापक / अध्यक्ष माय रमाई फाउंडेशन डॉ अमर चौरे, प्राध्यापक संपत गारगोटे, शिवव्याख्याते अध्यक्ष, आंतरराष्ट्रीय मानवाधिकार न्यायिक सुरक्षा परिषद, ग्रामीण पुणे जिल्हा गणेश खंडागळे यांनी त्यांना हा पुरस्कार प्रदान केला.




हा कार्यक्रम तळेगाव दाभाडे, मावळ पुणे येथे पार पडला.

याeवेळी प्रमुख उपस्थिती डायरेक्टर ईशान्य ग्रुप ऑफ कंपनी नितीन सूर्यवंशी, अभिनेत्री आरोही हिवरकर, निर्माता, दिग्दर्शक हेमंत थोरात, युवा प्रबोधन साहित्य मंचाचे संस्थापक सागर भाऊ वाघमारे, अध्यक्ष रितेश वाघमारे आणि होम मिनिस्टर फेम क्रांती नाना मळेगावकर आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.















## थोडक्यात



### भारताचे संविधान लोकशाहीचा आत्मा : डॉ. शिरीष पिंगळे


**राजगुरूनगर (आरंभ पर्व) :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले संविधान हे भारतीय लोकशाहीचा आत्मा असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी येथे केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने आयोजित संविधान गौरव दिन कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा. रोहिणी पाटोळे, प्रा. रौनक भिसे, डॉ. जब्बार शेख उपस्थित होता. डॉ. शिरीष पिंगळे यांनी विद्यार्थ्यांना संविधानाचा अभ्यास करण्याचे आणि एक जबाबदार नागरिक म्हणून समाजात वावरण्याचे आवाहन केले. याप्रसंगी उपस्थितांनी संविधानातील प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन केले. सूत्रसंचालन डॉ. प्रभाकर जगताप यांनी तर आभार डॉ. जब्बार शेख यांनी मानले.




### महाराष्ट्र योगशिक्षक संघाचे चौथे योग महासंमेलन संपन्न

**आळंदी (आरंभ पर्व) :** योग शिक्षकांचा महासंमेलन आळंदी येथे नुकतेच साजरे झाले यामध्ये योगशिक्षकांच्या बौद्धिक क्षमतेमध्ये अधिक वाढ व्हावी यासाठी वेगवेगळ्या विषयांवरील व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते . विख्यात योगाभ्यासी असे प्रिन्सिपल ऑफ योग कॉलेज कैवल्यधाम येथील डॉक्टर शरदचंद्र भालेकर, द लोणावळा इन्स्टिट्यूट चे संचालक डॉक्टर मन्मथ घरोटे, भारतीय संस्कृती दर्शन चे संचालक डॉक्टर सुश्रुत सरदेशमुख, तसेच प्रख्यात स्त्रीरोगतज्ञ व योगाभ्यासी डॉक्टर विश्वास येवले यांची दर्जेदार व्याख्यान झाले . तर अनेक योगी खेळ आणि योगी संगीत रजनी सारख्या करमणुकीच्या कार्यक्रमातून सर्वांचे मन प्रसन्न झाले, याबरोबर आपला महाराष्ट्र योग शिक्षक संघ योग शिक्षकांसाठी काय कार्य करत आहे योग विषयाला योग्य न्याय कसा मिळावा यासाठी आपले संस्थापक अध्यक्ष मनोज निलपवार यांनी मार्गदर्शन केले. हा योगशिक्षक संघ कोणी एकाचा नसून फक्त आणि फक्त योगशिक्षकांचा आहे यामध्ये कोणीही अधिकारी किंवा पद धारण करणारा असा नसून प्रत्येक जण योग्य शिक्षक आहे आणि प्रत्येकाला आपले मत आपले विचार मांडण्याचा अधिकार आहे. , असे देखील सांगण्यात आले. तसेच संमेलनाचे प्रमुख पाहुणे डॉ.श्री.शरदचंद्र भालेकर यांनी योगशिक्षक एकत्र येणे का गरजेचे आहे हे सांगितले तसेच डॉ मन्मथ घरोटे सर यांनी समाज स्वास्थ्य घडविणारा हा योगशिक्षक एकत्र आलाच पाहिजे तर डॉ.राजेंद्र खेडेकर यांनी आश्वासन दिले की योगशीक्षकांच्या 12मागण्या सरकारपुढे ठेवल्या आहेत त्या पूर्ण होण्यासाठी मी स्वतः प्रयत्न करेल. तसेच ओमानंद स्वामी आणि गेठेमहाराज यांनी आशीर्वाद दिले. संस्थेचे स्मरणिका प्रकाशन व कुणाल महाजन लिखित योग गीता या पुस्तकाचे प्रकाशन माननीय पाहुण्यांच्या हस्ते झाले.

### महाराष्ट्राचा कौल विकासालाच.. मसालाकिंग डॉ धनंजय दातार



**पुणे (आरंभ पर्व) :** महाराष्ट्र विधानसभा 2024 निवडणुकीत राज्यातील जनतेने महायुतीला 200 हून अधिक जागा देत निर्विवाद बहुमत दिले आहे. हा निकाल महाराष्ट्र राज्याच्या प्रगतीसाठी हितकारी आणि उत्साहवर्धक ठरेल, असे एक उद्योजक या नात्याने वाटते. कारण कोणत्याही राज्याची आर्थिक-औद्योगिक प्रगती ही शासकीय धोरणांच्या स्थिरतेवर अवलंबून असते आणि धोरणे स्थिर राहण्यासाठी तेथील राजवट मजबूत असावी लागते. अशा शब्दांत अदील ग्रुप ऑफ सुपर स्टोअर्स, दुबई, युएई चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मसालाकिंग डॉ धनंजय दातार यांनी नव्या सरकारला शुभेच्छा दिल्या. पुढे ते म्हणाले, केंद्रात व महाराष्ट्रात पुढील पाच वर्षे एकाच आघाडीचे, एकविचाराने चालणारे आणि विकासाभिमुख सरकार काम करणार असल्याने आगामी काळात अस्थिर सरकार, तडजोडीचे सरकार किंवा राष्ट्रपती राजवट अशा आव्हानांचा मुकाबला करावा लागणार नाही आणि विकासासाठी केंद्रीय निधीचीही कमतरता भासणार नाही, हे खूप आश्वासक आहे. महायुतीच्या गेल्या शासनकाळात राज्यकर्त्यांच्या दूरदृष्टी मुळे महाराष्ट्रात प्रगतीची व्यापक आणि वेगवान पावले पडलेली दिसली आहेत. त्याच दमदार वाटचालीचा पुढचा टप्पा भविष्यकाळातही कायम राहील. पायाभूत सुविधा विकासाचे अनेक प्रकल्प पूर्ततेच्या टप्प्यात आहेत. त्यातील काही महाराष्ट्राइतकेच देशाच्या भरभराटीसाठीही महत्त्वाचे आहेत. समृद्धी महामार्ग, मेट्रो, बुलेट ट्रेन, नवे रस्ते व रेलमार्ग बांधणी तथा विद्यमान मार्गांचा विस्तार, वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, प्रस्तावित वाढवण बंदर ही त्यापैकी काही उदाहरणे. महाराष्ट्रात गुंतवणूक, वाहतूक, आयात-निर्यात, औद्योगिक विकास यांना पुढील पाच वर्षांत जोरदार चालना मिळेल, ज्याचा परिणाम राज्याची आर्थिक भरभराट होण्यावर होईल.

फ्रँन्क्स हॉट डॉग्सचा फ्रॅनग्लोबलशी भागीदारीतून

# भारतातील पहिल्या आऊटलेटचे केले अनावरण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जागतिक पातळीवर प्रसिद्ध झालेला फ्रँन्क्स हॉट डॉग्स या गुर्मेट हॉट डॉग्स ब्रँडने भारतात अधिकृतरीत्या प्रवेश केला आहे! फ्रँचायझी इंडियाचा आंतरराष्ट्रीय फ्रँचायझी विकास शाखा असलेल्या फ्रॅनग्लोबलशी भागीदारी करून या ब्रँडने भारतातील आपल्या पहिल्या आऊटलेट चिंचवड येथील एल्प्रो सिटी स्क्वॅअर या मॉलमध्ये हे आऊटलेट सुरू झाले आहे. या ऐतिहासिक आरंभाने या ब्रँडचा केवळ भारतीय बाजारपेठेत प्रवेश झालेला नाही, तर फ्रँन्क्स च्या भारतातील महत्त्वाकांक्षी वाढीसाठी पुण्यालाही लॉंच पॅडचे स्थान मिळाले आहे.




गतिमान खवय्येगिरी आणि साहसी खवय्यांसाठी ओळखल्या जाणाऱ्या तसेच स्थानिक चवीसह जागतिक आकर्षण यांचा मिलाफ झालेल्या पुण्यात फ्रँन्क्स हॉट डॉग्सला आपले नाविन्यपूर्ण, चवदार मेनू सादर करण्यासाठी परिपूर्ण वातावरण उपलब्ध होणार आहे.

प्रमुख पदार्थ हॉट डॉग्स , क्रिस्पी चिकन पॉप्स, ग्रिल्ड चीज आणि तजेलदार पेये यांच्या वैविध्यपूर्ण मिलाफाने बनलेला फ्रँन्क्स हॉट डॉग्स पुणेचा मेनू शहरातील खवय्यांना आकर्षित करणारा ठरणार आहे. अभिजात फ्लेवर्सपासून भारतीय मसाल्यांनी नटलेल्या नावीन्यपूर्ण ट्विस्ट्सपर्यंत येथील पदार्थ हे अन्य कुठेही मिळणार नाही असा अनुभव देणारे ठरतील.

हा आरंभ म्हणजे या वर्षीच्या सुरुवातील फ्रँचाईझ फेअरमध्ये स्वाक्षरी करण्यात आलेल्या मास्टर फ्रँचायझी करारात मान्यता देण्यात आलेल्या एका महत्त्वाकांक्षी विकास योजनेची केवळ सुरुवात आहे. फ्रँन्क्स हॉट डॉग्स आणि फ्रॅनग्लोबल यांचे पुढील पाच वर्षांत भारतभरात 300 आऊटलेट्स उघडण्याचे उद्दिष्ट आहे. त्यातील 100 ठिकाणी पुढील 18 महिन्यात सुरुवात होईल. फ्रँन्क्स हॉट डॉग्सचे सीईओ बेंजामिन ॲटल उत्साहाने म्हणाले की ,भारत ही एक गतिमान बाजारपेठ असून येथे प्रयोगशील खाद्याच्या अनुभवासाठी गहिरे प्रेम आहे. फ्रॅनग्लोबलशी आमच्या भागीदारीमुळे अव्वल दर्जा आणि सर्जनशीलतेचा फ्रँन्क्सचा वारसा आम्हाला या नवीन उत्साहवर्धक लोकांपर्यंत आणता येईल. पुण्यासारख्या गतिमान शहरातून त्याची सुरुवात होत आहे. या भागीदारीला स्थानिक तज्ज्ञतेची भर घालत फ्रँन्क्स हॉट डॉग्सचे पुणे एरिया डेव्हलपर्स संकेत वाघमारे आणि श्वेता वाघमारे म्हणाले, पुण्याचा वैविध्यपूर्ण आणि खाद्यप्रेमी वर्ग हा फ्रँन्क्सच्या प्रयोगशील पदार्थांशी पूर्णपणे सुसंगत आहे. जागतिक पातळीवरच्या या प्रसिद्ध ब्रँडला आपल्या शहरात घेऊन येताना आम्ही रोमांचित आहोत. पुणेकर प्रेमात पडतील असा फास्ट-कॅज्युअल खाद्यानुभव निर्माण करण्याची आम्हाला आशा आहे.

पुण्यातील आऊटलेटचा आरंभ हा फ्रँन्क्स च्या जागतिक विस्तार धोरणातीलही एक मैलाचा दगड आहे. बेल्जियम, स्विट्झर्लंड, नेदरलँडमधील नवीन आऊटलेट्स आणि 2024 च्या शेवटापर्यंत फ्रान्समधील आठ ठिकाणे यांचा त्यात समावेश आहे.

## अलायन्स इन्शुरन्स ब्रोकर्सचा पुण्यात नवीन कार्यालयासह विस्तार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अलायन्स इन्शुरन्स ब्रोकर्स प्रा.लि.ने पुण्यात आपल्या व्यवसायाचा विस्तार केला असून नवीन कार्यालय सुरू केले आहे. याप्रसंगी कंपनीचे सहसंस्थापक व संचालक अतुर ठक्कर,सीएसजीचे संचालक जी.एन.साथपती,प्लेसमेंट ॲन्ड अंडररायटिंगचे संचालक प्रांतिक मित्रा,क्षेत्रीय संचालक व हेड ऑफ इमर्जिंग मार्केट सीएसजी बाप्पादित रॉय व अलायन्स इन्शुरन्स ब्रोकर्सच्या मुख्य कार्यालयातील अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.या नवीन केंद्राद्वारे प्रॉपर्टी,मरिन,लायब्लिटी आणि आरोग्य विम्यासारखी पारंपरिक विमा उत्पादने अलायन्स तर्फे प्रदान केली जातील. त्याशिवाय ओपीडी आणि ॲफिनिटी इन्शुरन्स ,पुणे व नाशिक,छत्रपती संभाजीनगर,कोल्हापूर,फलटण इत्यादी आसपासच्या औद्योगिक शहरातील ग्राहक आणि व्यावसायिक संस्थांसाठी श्युरिटी बॉँडस यासारखे नवीन काळातील व अभिनव उत्पादने प्रदान केली जातील.भविष्यात विस्तारासाठी आणखी विमा उत्पादने प्रदान केली जातील.

सध्या पुण्यातील कार्यालयामध्ये 25 लोकं कार्यरत असून पुढील वित्तीय वर्षाच्या सुरुवातीला आणखी विस्तार होईल.

## काकड आरती सोहळ्याची सांगता

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

राजगुरूनगर येथे सुरू असलेल्या काकड आरती सोहळ्याची मंगळवारी (दि. 26) सांगता झाली. आश्विन शुध्द (कोजागीरी) पौर्णिमा ते कार्तिक शुद्ध पौर्णिमा व कार्तिकी (उत्पत्ती ) एकादशीला होणाऱ्या सोहळ्यात परिसरातील भाविक मोठ्या प्रमाणावर दररोज पहाटेपासून नियमितपणे सहभागी होतात.

*देखीला देखीला ,*
*माये देवांचा देव ।*
*फिटला निःसंदेह ,*
*निमाले दुजेपण ।*
*अनंतरूपे ,अनंतवेषे*
*देखिले म्या त्यासी ।*
*बाप रखुमा देवीवर दाखुण*
*बाणली कैसी ॥ "*



अशा सुमधुर भक्तीमय सुरांनी आणि टाळ मृदुंगाच्या साथीने वातावरण मंत्रमुग्ध होत असे. येथील ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण मंडळाच्या ज्ञान मंदिरात परिसरातील भाविक नियमितपणे येऊन काकड आरती सोहळा साजरा करतात.


दररोजच्या कार्यक्रमाचे संयोजन ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण मंडळाचे अध्यक्ष व माजी सरपंच शांताराम घुमटकर, उपाध्यक्ष विलास कहाणे, अनिल लांडगे, विठ्ठल सांडभोर, अविनाश कहाणे, विजय भालेकर, संभाजी थिगळे , नामदेव कहाणे, जि. र. शिंदे (गुरुजी), अनिल कहाणे, सुरेश घुमटकर, मच्छिंद्र भालेकर, मनोहर पाकळे, बाळासाहेब दौंडकर, विजय भुते, संजय भनसाळी, जगदीश कहाणे आदींनी केले.

## मुंबईत 'इंटर डेअरी एक्स्पो 2024' चे आयोजन

- भारताच्या २०२३- २४ या आर्थिक वर्षातील दूध उत्पादनाने २३०.५८ दशलक्ष मेट्रिक टनांचा विक्रमी उच्चांक गाठला आहे.
- भारतीय दुग्धव्यवसाय वार्षिक ९ टक्के दराने वाढत असून २०३० पर्यंत या क्षेत्राची उलाढाल २३० बिलियन अमेरिकी डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे.

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतीय दुग्धव्यवसायाने गेल्या दशकात उल्लेखनीय प्रगती केली आहे. प्रगतीचा हा आलेख असा सुरू राहावा यासाठी व्हीए एक्झिबिशन्स आणि इंडिया डेअरी असोसिएशन (पश्चिम झोन) यांच्या सहकार्याने 5 ते 7 डिसेंबर 2024 दरम्यान मुंबईतील बॉम्बे एक्झिबिशन




सेंटर येथे 'इंटर डेअरी एक्स्पो 2024 ' चे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनात या क्षेत्रातील संपूर्ण पुरवठा साखळीशी संबंधित घटक पाहता येणार असून दुग्धव्यवसायातील नवकल्पना, तंत्रज्ञान आणि संधी जाणून घेण्यासाठी हे प्रदर्शन एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरेल. टिकाऊ तंत्रज्ञान, आधुनिक पॅकेजिंग, प्रक्रियेतील नवीन उपाय आणि प्रगत ऑटोमेशन अशा अनेक गोष्टी या प्रदर्शनात पाहायला मिळतील. या प्रदर्शनात 120 हून अधिक भारतीय आणि जागतिक कंपन्या सहभागी होतील. सध्या, भारत हा जगातील सर्वाधिक दुग्धोत्पादन करणारा देश आहे. जागतिक पातळीवर होणाऱ्या एकूण दूध उत्पादनापैकी 24 टक्के दुग्धोत्पादन भारतात होते. 2023- 2024 या वर्षात भारतात 230.58 दशलक्ष मेट्रिक टन इतके विक्रमी दुग्धोत्पादन झाले. चीनच्या तुलनेने हे तिप्पट आहे. भारतीय दुग्धक्षेत्र बाजारपेठेची उलाढाल सध्या अंदाजे 125 अब्ज अमेरिकन डॉलर इतकी असून यात वार्षिक 9 टक्के वाढ होऊन 2030 पर्यंत ही बाजारपेठ 230 अब्ज अमेरिकन डॉलरपर्यंत पोहोचेल, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. दुग्धोत्पादनापासून ते दुग्धप्रक्रिया व पॅकेजिंगमध्ये स्वीकारण्यात आलेले तंत्रज्ञान, त्याचप्रमाणे भारत सरकारने भारतीय दुग्धव्यवसायाला दिलेले सक्रिय पाठबळ यामुळे हे शक्य झाले आहे.

भारतीय दुग्धोत्पादन क्षेत्राच्या महत्त्वाच्या भूमिकेविषयी इंडियन डेअरी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आर. एस. सोधी म्हणाले, "दुग्धोत्पादन क्षेत्राने 80 मिलियन कुटुंबांना उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध करून दिले आहे. यात प्रामुख्याने भूमिहीन आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांचा समावेश आहे. दुग्धोत्पादन क्षेत्र हे विशेषतः महिलांना रोजगार उपलब्ध करून देणारे क्षेत्र आहे आणि देशभरातील महिला सबलीकरणामध्ये या क्षेत्राची महत्त्वाची भूमिका आहे.

## एचडीएफसी एर्गोने कटिबद्धतेला केले अधिक दृढ

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील आघाडीची खाजगी क्षेत्र सामान्य विमा कंपनी एचडीएफसी एर्गो जनरल इन्शुरन्स कंपनीने आज महाराष्ट्रात आरोग्य विमा अवलंबतेला गती देण्याच्या आपल्या योजनांची घोषणा करत महाराष्ट्राप्रती आपल्या कटिबद्धतेला अधिक दृढ केले आहे. विमा कंपनीसाठी महाराष्ट्र ही प्रमुख बाजारपेठ असण्यासह एचडीएफसी एर्गोचे महाराष्ट्रात 6,416 एजंट्स आणि 42 शाखांचे प्रबळ नेटवर्क आहे, ज्यापैकी 3 शाखा पुण्यामध्ये आहेत.

चालू असलेल्या आर्थिक वर्षासाठी, आर्थिक वर्ष 25 च्या दुसऱ्या तिमाहीपर्यंत विमा कंपनीने पुण्यामध्ये 70 कोटी रुपयांचे 17,214 आरोग्य दावे आणि महाराष्ट्रात 2,121 कोटी रुपयांचे 4.29 लाख आरोग्य दावे निकाली काढले आहेत.

एचडीएफसी एर्गोचे संचालक व चीफ बिझनेस ऑफिसर पार्थनील घोष म्हणाले की , "नियामकांचा दृष्टिकोन '2047 पर्यंत सर्वांसाठी विमा'चे मार्गदर्शन असलेल्या एचडीएफसी एर्गोमध्ये आम्ही कानाकोपऱ्यापर्यंत विम्याबाबत जागरूकतेचा प्रसार करण्यासाठी 'अवेअरनेस, अव्हेलेबिलिटी अँड ॲक्सेसिबिलिटी' या तीन आधारस्तंभांवर लक्ष केंद्रित करत आहोत. पुणे आमच्यासाठी प्रमुख बाजारपेठ आहे आणि आम्ही ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देण्यासाठी अधिक गुंतवणूक केली आहे. तसेच आम्ही विम्याचे महत्व व जागरूकता वाढवण्याप्रती कटिबद्ध आहोत."

# रुबी मेडिकल सर्व्हिसेसतर्फे अनामया एमआरआय मशीनचे अनावरण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

रुबी मेडिकल सर्व्हिसेस तर्फे ताजने माळा,नवीन नगर रस्ता,संगमनेर येथील आपल्या सुविधेमध्ये अनामया या भारतातील पहिल्या स्वदेशी बनावटीचे 1.5 टी एमआरआय मशीन प्रस्थापित करण्यात आले आहे. मेक इन इंडिया पुढाकार अंतर्गत अद्यावत वैद्यकीय तंत्रज्ञानात अग्रणी असलेल्या आणि रेफेक्स समूहाचा भाग असलेल्या थ्रीआय मेडटेक कंपनीने विकसित केलेले हे मशीन म्हणजे भारतातील आरोग्य सेवा क्षेत्रात परिवर्तनीय टप्पा आहे.

आंध्रप्रदेश मधील विशाखापट्टणम येथील मेडटेक झोन (एएमटीझेड) येथे निर्मित केलेले अनामया हे भारतातील अभिनवता व उत्कृष्टतेचा पुरावा आहे.अनामया हे आरोग्याशी निगडीत असून इमेजिंग द पाथ टू वेलनेस या तत्त्वासह विश्वास आणि प्रगतीचे प्रतीक आहे.हे अद्यावत व पथदर्शक एमआरआय मशिन प्रगत इमेजिंग तंत्रज्ञानासह अचूक निदान प्रदान करते,त्याचबरोबर जलद स्कॅन,रुग्णांसाठी अधिक सुलभता आणि किफायतशीर प्रक्रिया प्रदान करते.या मशिनचे अनावरण म्हणजे दुर्गम भागांमध्ये जागतिक दर्जाच्या निदान सुविधा प्रदान करण्याचे रुबी मेडिकल सर्व्हिसेसच्या ध्येयाशी सुसंगत आहे.




अनावरणाच्या या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. याप्रसंगी रुबी हॉल क्लिनिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी बेहराम खोडाईजी,कन्सल्टंट रेडिओलॉजिस्ट व विभागप्रमुख डॉ.प्रणव महादेवकर आणि रुबी हॉल क्लिनिकच्या धोरण व व्यवसाय विकास विभागाच्या सरव्यवस्थापक नताली ग्रांट नंदा यांसह वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमात दीप प्रज्वलन,अनामया एमआरआय मशिनचे अनावरण करण्यात आले आणि त्यानंतर रुबी हॉल क्लिनिकचा आरोग्य सेवा क्षेत्रातील उत्कृष्टतेचा वारसा दर्शविणारी कॉर्पोरेट फिल्म प्रदर्शित करण्यात आली.

रुबी हॉल क्लिनिकचे चीफ कार्डिओलॉजिस्ट,अध्यक्ष व व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ.पी.के.ग्रांट यांनी या महत्त्वाच्या टप्प्याबाबत आपला आनंद व्यक्त केला.ते म्हणाले,मेडिकल इमेजिंग तंत्रज्ञानामध्ये पथदर्शक,अभिनव संकल्पना आणि भारतात असेंबल केलेले अनामया 1.5 टेस्ला एमआरआय स्कॅनर आमच्या संगमनेर युनिटमध्ये प्रस्थापित करणे ही आमच्यासाठी अभिमानास्पद बाब आहे.हे अद्यावत मशिन म्हणजे केवळ प्रगत तंत्रज्ञान नव्हे तर अद्वितीय प्रतिमा गुणवत्ता आणि निदान अचूकता प्रदान करून रेडिओलॉजिस्टच्या वैद्यकीय गरजा पूर्ण करते.किफायतशीर दरासह हे मशिन सर्वांसाठी उपलब्ध होऊन आरोग्य सेवा पुरवठादार आणि रुग्णांमधील दरी भरून काढण्यास मदत करेल.आमचे ध्येय हे सहज उपलब्ध असलेले किफायतशीर,विश्वसनीय आणि जागतिक दर्जाच्या मेडिकल इमेजिंग सोल्युशन्स प्रदान करणे हे आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.